मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दि. 19 सप्टेंबर 2025 | पान- 1


# महापालिका शाळांना मिळतेय पालकांची पसंती!

## नाविन्यपूर्ण उपक्रम, सुरक्षित वातावरण आणि दर्जेदार शिक्षणामुळे वाढला विश्वास

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने वाढत आहे. यू-डायस (UDISE+) च्या आकडेवारीवरून हे स्पष्ट झाले आहे. एकीकडे बहुतांश महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या घटत असताना पिंपरी चिंचवड महापालिकेत विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. यावरून या शाळांचा दर्जा दिवसेंदिवस अधिक सुधारत असल्याचे चित्र आहे. तसेच या शाळांच्या स्वतंत्र मूल्यमापनात शैक्षणिक निकालांमध्ये लक्षणीय सुधारणा होत आहे.

यू-डायसच्या आकडेवारीनुसार पिंपरी चिंचवड महापालिकेच्या १३४ शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये ४८ हजार १५३ इतकी असलेली प्रवेशसंख्या वर्ष २०२३-२४ मध्ये ५० हजार ५८१, तर शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ५० हजार ७४९ वर पोहोचली आहे. तर चालू शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये ८ सप्टेंबरपर्यंतच ही संख्या ५४ हजार ४१८ इतकी झाली आहे. यामध्ये मुलींचे प्रमाण सातत्याने वाढत असून ते शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये २४ हजार ७८८ वरून वर्ष २०२३-२४ मध्ये २५ हजार ९०२ आणि शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये २५ हजार ९२२ इतके झाले आहे.



> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमध्ये मुलींच्या प्रवेशसंख्येत झालेली वाढ ही विशेष उल्लेखनीय आहे. यामधून पालकांचा महापालिका शाळांवरील सुरक्षा व गुणवत्तेवरील विश्वास दिसून येतो. क्युसीआयच्या फ्रेमवर्कमधून महापालिका शाळांमधील शैक्षणिक निकाल सुधारण्याचा उपक्रम यशस्वी ठरत आहे. विविध शैक्षणिक उपक्रमांद्वारे ही प्रगतीची गती कायम ठेवण्यास महापालिका कटिबद्ध आहे.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, महापालिका.**

महापालिकेच्या शाळांमध्ये केवळ प्रवेशसंख्याच वाढत नाही, तर मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तेमध्ये देखील चांगली वाढ दिसून येत आहे. क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया (QCI) च्या मूल्यमापनानुसार प्रारंभीच्या पातळीवरील विद्यार्थ्यांचे प्रमाण शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील २८ टक्क्यांवरून वर्ष २०२४-२५ मध्ये १३ टक्क्यांवर आले, तर उच्च पातळीवर पोहोचलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ०.५ टक्क्यांवरून ६ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. यामध्ये विशेषतः प्राथमिक वर्गांच्या निकालांमध्ये लक्षणीय सुधारणा दिसून आली आहे. इयत्ता दुसरीतील प्रारंभी पातळीवरील विद्यार्थी ३० टक्क्यांवरून ७ टक्क्यांपर्यंत कमी झाले आहेत, तर प्रगत विद्यार्थ्यांचे प्रमाण ० टक्क्यांवरून थेट २५ टक्क्यांवर गेले आहे.

**विद्यार्थ्यांना होतो आहे विविध उपक्रमांचा फायदा**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून राबवण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचा फायदा होत आहे. महापालिकेच्या २११ बालवाड्यांमधील ६ हजारांपेक्षा जास्त मुलांसाठी बालसुलभ वर्गखोल्या आहेत. मूल्यमापनात प्रारंभिक साक्षरता, अंकगणित व इतर कौशल्यांमध्ये २०–२४ टक्के सुधारणा आढळली आहे. याशिवाय 'स्पंदन' कार्यक्रम सामाजिक-भावनिक शिक्षण व जीवनकौशल्यांवर भर देत आहे. 'इंग्रजी अॅज सेकंड लँग्वेज' (ESL) उपक्रमांतर्गत २७ हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी इंग्रजी भाषेचा वापर आत्मविश्वासाने करीत आहेत. 'द आर्ट बॉक्स' प्रदर्शन व 'जल्लोष शिक्षणाचा' यांसारखे सांस्कृतिक उपक्रम विद्यार्थ्यांचा दृष्टीकोन विस्तारण्यास मदत करीत आहेत. तर 'भारत दर्शन' दौऱ्यांतून गुणवंत विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक अनुभव मिळत आहेत. याशिवाय सुरक्षित शिक्षण वातावरणासाठी महापालिकेने एनसीपीसीआर (NCPCR) व एनसीईआरटी (NCERT) मार्गदर्शक तत्त्वांनुसार शाळा सुरक्षा लेखापरीक्षण सुरू केले आहे. पोलीस विभागाच्या 'पोलीस काका' व 'दामिनी स्क्वॉड' यांच्या सहकार्याने तसेच मुस्कान फाउंडेशन व अर्पण यांच्या माध्यमातून शाळांमध्ये बालसंरक्षण प्रशिक्षण दिले जात आहे. शाळांमध्ये सध्या २३ समुपदेशक कार्यरत असून शाळा व्यवस्थापन समित्या सुरक्षा व बालसंरक्षण उपाययोजनांवर काटेकोरपणे लक्ष देत आहेत.

---

# एस.बी. पाटील पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांची 11 सुवर्ण पदकांची कमाई

## 19 वर्षाखालील गटात अॅक्रोबॅटिक स्पर्धेत उत्तुंग कामगिरी करत 11 सुवर्ण व 2 रौप्य पदकांची कमाई

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी १९ वर्षाखालील गटात अॅक्रोबॅटिक स्पर्धेत उत्तुंग कामगिरी करत ११ सुवर्ण व २ रौप्य पदकांची कमाई केली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय शालेय अॅक्रोबॅटिक स्पर्धा २०२५-२६ (दि. १३) निगडी येथील एलाइट फिटनेस अकॅडमी येथे आयोजित करण्यात आल्या होत्या.




या स्पर्धेत पुणे, पिंपरी चिंचवड शहर आणि पुणे जिल्ह्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन कौशल्यपूर्ण सादरीकरण केले. यामध्ये एस. बी. पाटील पब्लिक स्कूल मधील विविध गटातील विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान कामगिरी केली. यामध्ये मुलींच्या संघात इयत्ता ६ वी मधील वीरा काटकर, वैदेही निकम आणि आर्या थोरात यांनी सुवर्ण पदक जिंकले. सावनी बडवे (इयत्ता ६ वी) आणि ओम पाटील (इयत्ता ९ वी) यांनी मिश्र जोडीत सुवर्ण पदक मिळवले.

मुलांच्या संघात इयत्ता ८ वी मधील रुद्र जंगलीवाड, अमित कोडगुनूरा, राजवीर अंजुरे, आदित्य खाडे, पवन खैरनार आणि इयत्ता ६ वी मधील अनय पवार यांनी सुवर्ण पदक मिळवून शाळेचा मान वाढविला. स्पर्धेत सुवर्णपदक जिंकलेल्या सर्व विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. मुलींच्या संघात आबोली डोंबाळे (इयत्ता ७ वी) आणि श्रावणी भोंडवे (इयत्ता ७ वी) यांनी रौप्य पदक पटकावले. प्राचार्या डॉ. बिंदू सैनी, उपप्राचार्या पद्मावती बंडा व क्रीडाशिक्षक धनाजी पाटील यांनी मार्गदर्शन केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील विभागीय आणि राज्य स्पर्धेसाठी यशस्वी होण्यास शुभेच्छा देऊन कौतुक केले.

# गटबाजी करू नका, सर्वांना विश्वासात घेऊन काम करा

## शिवसेनेचे उपनेते, मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना सूचना



**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका शिवसेनेला पूर्ण ताकदीने लढायच्या आहेत. त्यादृष्टीने सर्वांनी कामाला लागावे. शिवसेना एक परिवार आहे. त्यामुळे कोणीही गटबाजी करु नये, सर्वांना विश्वासात घेऊन काम करावे, अशा सूचना शिवसेनेचे उपनेते, मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना दिल्या.

शिवसेनेचे मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मावळमधील पक्ष संघटनेत फेरबदल केले आहेत. पिंपरी-चिंचवड महानगर प्रमुखपदी राजेश वाबळे, मावळच्या जिल्हाप्रमुखपदी राजेश खांडभोर, पिंपरी, चिंचवड आणि मावळ विधानसभा मतदारसंघाच्या समन्वयकपदी बाळासाहेब वाल्हेकर, जिल्हा संघटिकापदी शिला भोंडवे, मावळ तालुकाप्रमुखपदी राम सावंत यांची नियुक्ती केली आहे. या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते गुरुवारी सत्कार करण्यात आला.

यावेळी उपनेत्या सुलभा उबाळे, युवा सेनेचे पश्चिम महाराष्ट्राचे सचिव विश्वजित बारणे, शिवसेना उपजिल्हा प्रमुख दिलीप पांढरकर, राजेंद्र तरस, विशाल हुलावळे, शिवसेना महिला तालुका प्रमुख शुभांगी काळंगे, पिंपरी-चिंचवड शहर प्रमुख निलेश तरस, माऊली जगताप, सुनिल हगवणे, मा नगरसेवक बाळासाहेब ओव्हाळ, पिंपरी विधानसभा महिला संघटिका शैला निकम यांच्यासह पिंपरी, चिंचवड व मावळ तालुक्यातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संघटनेत फेरबदल केले आहेत. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना काम करण्यास मोठी संधी मिळणार आहे. शिवसेनेचे जास्तीत-जास्त नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य निवडून आणायचे आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ताकद आपल्या सर्वांच्या पाठिशी आहे. त्यामुळे निवडणुकीच्या दृष्टीने सर्वांनी कामाला लागावे. संपर्क वाढवावा. शाखांची बांधणी करावी. तळागातील लोकांना संघटनेशी जोडावे. संघटना अधिक बळकट, मजबूत करावी. तरुणांना शिवसेनेशी जोडावे. शिवसेना हा एक परिवार आहे. त्यामुळे सर्वांनी परिवार म्हणून काम करावे. कोणीही गटबाजी करु नये, प्रत्येकाला विश्वासात घेऊन संघटना वाढवावी. तत्कालीन मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री लाडकी बहिण, शासन आपल्या दारी, मुलींच्या शिक्षणासाठी मदत अशा विविध योजना राबविल्या आहेत. या योजना लोकांपर्यंत पोहोचवाव्यात. योजनांचा लाभ लोकांना मिळवून द्यावा.

# आमदार अमित गोरखे यांचा "एक पेड माँ के नाम" उपक्रम

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त शाहूनगर येथे 51 फुटी वृक्षाची लागवड



**पिंपरी | प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी-चिंचवड शहरात आमदार अमित गोरखे यांच्या माध्यमातून अभिनव उपक्रम राबवण्यात आला. 'एक पेड माँ के नाम' या संकल्पनेवर आधारित आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या 'संघ शताब्दी पंचसूत्री' मधील 'पर्यावरण' या प्रमुख विषयाचा समन्वय साधत, शाहूनगर येथील शिव शाहू शंभो उद्यानात ५० फुटी अश्वत्थ वृक्षाचे वृक्षारोपण करण्यात आले. हा ऐतिहासिक सोहळा माजी नगरसेविका अनुराधा गोरखे यांच्या हस्ते पार पडला, जो मातृशक्तीच्या सन्मानाचा अनोखा संदेश ठरला.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश मातृशक्तीप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, तिच्या निस्वार्थ सेवेला अभिवादन करणे आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनमानसात पोहोचवणे हा होता. हा उपक्रम डी वाय पी इन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला, ज्यात संचालक दत्तात्रय यादव यांचीही उपस्थिती होती. सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून पर्यावरण संरक्षणास हातभार लावणे हे या उपक्रमामागील मुख्य उद्दिष्ट होते.

याप्रसंगी बोलताना आमदार अमित गोरखे म्हणाले, "आई ही आपल्या जीवनाची पहिली गुरू आहे. तिच्या निस्वार्थ सेवेला कृतज्ञतेने अभिवादन करण्याचा हा उपक्रम आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनानिमित्त आपण सर्वांनी आपल्या मातृनावाने झाड लावले, तर प्रत्येक घरातून हरित संदेश समाजापर्यंत पोहोचेल. हे झाड मातृस्मृतीचे स्मारक ठरेल आणि पुढील पिढ्यांना स्वच्छ, हरित वारसा मिळवून देईल."

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक विनोद बन्सल यांनीही या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. 'संघ शताब्दी पंचसूत्री' मधील पर्यावरणविषयक संकल्पना प्लास्टिक मुक्त भारत आणि वृक्षारोपण यावर आधारित असून, त्याला मूर्त रूप देत आमदार गोरखे यांनी हा उपक्रम राबवला.

यावेळी विनोद बन्सल, हेमंत हरहरे, राजू दुर्गे, शीतल शिंदे, गणेश लंगोटे, सुप्रिया चांदगुडे, वैशाली खाडे, अनुराधा गोरखे, मनीषा शिंदे, नेताजी शिंदे, अजित भालेराव, राजेश पिल्ले, धरम वाघमारे, धर्मेंद्र शिरसागर, गुरूदत्त सेवा मंडळाचे शाम मोरे, शाहूनगर ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी, सावरकर मित्र मंडळ पदाधिकारी, वैशाली करंजकर, प्रतिभा जवळकर, अविनाश पाटील, भाऊसाहेब कोकाटे, वाडकर काका, हरिमामा, सपकाळ सर, वाडेकर काका, चेतन बेंद्रे, कविता हिंगे, प्रतिभा जवळकर, संदीप जाधव, दीपाली करंजकर, बी के कोकाटे, अनिता वाळुंजकर, नरेश पंजाबी आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महसूल विभाग सुधारला तर सरकार सुधारेल


## राज्यस्तरीय सेवा पंधरवड्याचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते

**पुणे | प्रतिनिधी**

ई-नोंदणीच्या माध्यमातून सामान्य माणसाला होणारा त्रास कमी करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. मात्र, महसूल विभागाने नव्याने दावे निर्माण होणार नाहीत, हे ध्येय ठेवले पाहिजे. फेरफार उताऱ्यात चुका, मोजणीत चुका या मानवनिर्मित चुका टाळून प्रलंबित दावेही निकाली काढावे लागतील. महसूल विभागात सुधारणा झाली तर सरकारही सुधारेल, असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे बुधवारी व्यक्त केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त महसूल खात्याच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सुरू करण्यात आलेल्या राज्यस्तरीय सेवा पंधरवड्याचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, जमाबंदी आयुक्त सुहास दिवसे, नोंदणी महानिरीक्षक रवींद्र बिनवडे, विभागीय आयुक्त डॉ चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अतिरिक्त जिल्हाधिकारी सुहास मापारी, खासदार मेधा कुलकर्णी, चित्रपट अभिनेते नाना पाटेकर यांच्यासह आमदार आणि महसूल, जमाबंदी आणि नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हा प्रशासनाने राबविलेल्या विविध अभिनव उपक्रमाचे कौतुक महसूल मंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी केले.



फडणवीस म्हणाले, ‘सर्वसामान्य नागरिकांना जगण्यासाठी ज्या गोष्टी लागतात. त्या सोप्या कशा करता येतील, घरबसल्याच्या त्यांना सेवा कशी मिळेल, हाच ‘इज ऑफ लिव्हिंग’ भाग आहे. नागरिकांना सरकारी कार्यालयात हेलपाटे मारावे लागू नयेत, हाच शासनाचा उद्देश आहे. त्यासाठी अधिकाधिक सेवांचे डिजिटायेझन करण्यात येत आहे. मात्र नव्याने दावे निर्माण होणार नाहीत, हे ध्येय महसूल विभागाने ठेवले पाहिजे. प्रलंबित दावे निकाली लावले पाहिजेत. फेरफार उताऱ्यात चुका, मोजणीत चुका या मानवनिर्मित चुका टाळता आल्या पाहिजेत. त्यातूनच नागरिकांचे जीवन सुकर होईल.’

दरम्यान, महसूल विभागाच्या विविध सेवा देतांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या उपयोगाद्वारे सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन आणले जाईल आणि त्याची सुरूवात सेवा पंधरवड्याच्या निमित्ताने करण्यात येईल. सामान्य माणसाचे जीवन अधिक सुलभ करताना त्याच्या समस्या वेगाने दूर करण्यासाठी सेवा हमी कायद्यांतर्गत १ हजार १०० सेवा येत्या १ मेपर्यंत डिजीटल पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येतील. त्यानुसार पहिल्या टप्प्यात ४४ सेवा ऑनलाइन करण्यात येणार आहेत.

नागरिकांशी संबंधित सेवा नीट दिल्या तरी शासकीय कार्यालयातील गर्दी कमी होईल. त्यामुळे येत्या तीन महिन्यात या सेवा हमी कायद्याशी जोडण्याबरोबरच ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. २६ जानेवारीपर्यंत आखणी २०० सेवा, तर १ मे २०२२६ पर्यंत ११०० सेवा ऑनलाइन उपलब्ध करून देण्याचे उदिष्ट शासनाने ठेवले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक खारगे यांनी केले. यावेळी विविध मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. नाम फाउंडेशन आणि राज्य शासन यांच्यातील करारावर यावेळी स्वाक्षरी करण्यात आली. पुणे शहराचे प्रांत विठ्ठल जोशी यांनी सूत्रसंचालन केले. तर राज्यमंत्री योगेश कदम यांनी आभार मानले.

### लोकाभिमुख कारभार हाच उद्देश

» लोकाभिमुख कारभार हेच ध्येय ठेऊन महायुतीचे सरकार काम करीत आहे. त्यामध्ये प्रशासनाचे सहकार्य हवे आहे, असे उपमुख्यंत्री अजित पवार यांनी सांगितले. सेवा पंधरवड्याच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्यात येणार आहे.

### अधिकाऱ्यासोबतच्या वादावर पवारांचे मिश्किल भाष्य

» सोलापूरमधील कुर्डू येथील अवैध गौण खनिज उत्खननावरून महिला पोलिस अधिकाऱ्यासोबत झालेल्या वादावरही पवार यांनी मिश्किल भाष्य केले. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पाणंद रस्त्यांसाठी मुरूम टाकल्यास रॉयल्टी लागणार नाही तसेच पोलिसांचा बंदोबस्त ही विनामूल्य मिळेल, असेल असे सांगितले. त्यामुळे ‘पोलीसांनी पाणंद रस्त्यावर मुरुम टाकणे टाकण्यासाठी परवानगी आहे याची नोंद घ्यावी. सर्व ही बाब तिकडे सोलापुरातही सांगावे, असा मिश्किल टोला लगावत बावनकुळे यांनी ही योजना एक महिन्यापूर्वी आणली असती तर या बाबीचा गवगवा झाला नसता, अशी टिप्पणी केली.

# तब्बल 1.2 कोटी रुपये खर्चूनही स्वारगेट ‘बस स्टँड’ पाण्यात

## टप्पा एक, दोन, तीन आणि चारसंदर्भात सुरू असलेल्या कार्यवाहीबाबत आढावा

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात गेल्या दोन दिवसांपासून मेघगर्जनेसह, मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असताना, स्वारगेट बस स्थानकातील प्रवासी, तसेच एसटीलादेखील याचा फटका बसला. सहा महिन्यांपूर्वी १.२ कोटी रुपये खर्च करून दुरुस्ती करण्यात आलेल्या स्थानकात पाण्याचे तळे साचल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय झाली.

या बस स्थानकाच्या परिसरात दुर्गंधी, प्रवाशांची गैरसोय आणि वाहतुकीला अडथळा, अशा अनेक समस्या होत्या. एसटी महामंडळ आणि पुणे महानगरपालिका यांनी परिसरातील जुन्या मलनिस्सारण वाहिन्यांची दुरुस्ती करून नवीन वाहिन्या टाकल्या. पाणथळ असलेल्या ठिकाणी भराव टाकण्यात आला. लोखंडी जाळ्यांची गटारे तयार करण्यात आली. मार्च महिन्यात हे काम पूर्ण करण्यात आले. त्यासाठी सुमारे १.२ कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे.



मात्र, गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामध्ये कोट्यवधी रुपयांचा खर्च पाण्यात वाहून गेल्याचे दिसून आले. बस स्थानकाच्या उत्तर आणि पश्चिम भागातील प्रवेशद्वारांच्या रस्त्यावर खड्डे आणि पाणी साचत असल्याने प्रवाशांना त्रास सहन करावा लागला. स्थानकाच्या दक्षिणेकडील भागात दुरुस्ती आगारातही पाण्याचे मोठे तळे साचत असल्याने बस वाहतुकीला अडथळा निर्माण झाला.

**परिवहन मंत्र्यांकडून कानउघाडणी**

दोन दिवसांपूर्वी परिवहन मंत्री सरनाईक यांनी स्वारगेटच्या स्थानकात येऊन पाहणी केली. मात्र, मंत्री येणार याची कुणकुण लागल्याने स्थानकातील अडथळे दूर करण्यात आले. स्वच्छतागृहे स्वच्छ करण्यात आली. ही तात्पुरती मलमपट्टी पाहून सरनाईक यांनी असुविधेवरून अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली. या भेटीनंतर दोन दिवस झालेल्या पावसाने या स्थानकात पाण्याचे तळे साचल्याने प्रवाशांना गैरसोयीला सामोरे जावे लागले.

> “स्वारगेट स्थानकात पाणी साचत असलेल्या ठिकाणी दुरुस्ती करण्यात आली आहे. मात्र, गेल्या दोन दिवसांपासून पावसाचा जोर जास्त असल्याने पाणी साचले. रस्त्यांची दुरुस्ती महापालिका आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आली आहे. पाणी साचणाऱ्या ठिकाणी आणि रस्ते दुरुस्तीसाठी संबंधित विभागांना पुन्हा सूचना देण्यात आल्या आहेत.
>
> – अरुण सीया, विभाग नियंत्रक, एसटी महामंडळ.

# राज्यातील प्रत्येक जिल्ह्याचा गौण खनिज आराखडा

## खाणचालकांनी एम सँड प्रकल्प तीन वर्षांच्या आत टाकणे बंधनकारक; महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील अनेक जिल्ह्यात गौण खनिज क्षेत्र जाहीर झालेले नसल्यामुळे कृत्रिम वाळू उत्पादकांना वेगवेगळ्या विभागांची परवानगी घ्यावी लागत आहे. त्यामुळे सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी पुढील महिन्याभरात गौण खनिज क्षेत्राचा आराखडा करून तो राज्य शासनाला सादर करावा, असा आदेश राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला आहे.

राज्य शासनाच्या सेवा पंधरवडा उपक्रमाअंतर्गत नव्याने लागू केलेल्या 'एम सँड' धोरणासंदर्भात बावनकुळे यांनी खाण चालक क्रशर मालक बांधकाम व्यावसायिक आणि अधिका-यांच्या अडचणी जाणून घेतल्या. त्यावेळी गौण खनिज क्षेत्राचा आराखडा जाहीर झालेला नसल्याचे स्पष्ट झाले.

'एम सँड धोरण चांगले आहे. ग्रामपंचायतींच्या ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याची आवश्यकता नाही ही बाब स्तुत्य आहे. मात्र दीर्घ मुदतीचा खाणपट्टा घेण्यासाठी त्रास सहन करावा लागतो. दीर्घमुदतीचे खाणपट्टे घेताना ग्रामपंचायतींचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक करण्यात आले आहे. त्या मुळे ती अट रद्द करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. त्यावर ग्रामपंचायतींनी तीस दिवसांच्या कालावधीत परवानगी न दिल्यास त्याची जबाबदारी ग्रामपंचायतींवर राहिल अशी सुधारणा शासन निर्णयात केली जाईल. सरसकट खाण उद्योगांना सवलती मिळणार नाहीत. खाणचालकांनी एम सँड प्रकल्प तीन वर्षांच्या आत टाकणे बंधनकारक आहे. त्यानंतरच त्यांना सर्व सवलती मिळतील असेही बावनकुळे यांनी सांगितले.



दर अकरा महिन्यांनी ट्रेडिंग लायसन्स काढावे लागते. त्याची मुदत वाढवावी या मागणीनुसार तीन वर्षांसाठी ती देण्याची सुधारणा निर्णयात केली जाणार आहे. खाणपट्ट्यासाठी अकृषिक परवान्याची गरज नसल्याचे सांगून जिल्हाधिकाऱ्यांनी गौण खनिज क्षेत्र आणि त्याचा आराखडा जाहीर करावा. प्रांताधिका-यांनी आठमुठे धोरण अवलंबू नये अशी सूचना त्यांनी केली. तसेच परवानगी देण्यासाठी एक खिडकी योजना सुरू करण्याची सूचनाही त्यांनी मान्य केली.

### हिलटॉप खोदण्यास मनाई

» टेकडी आणि डोंगरांच्या परिसरात सर्वाधिक दगड असल्यामुळे तेथील उत्खननाची परवानगी द्यावी अशी मागणी करण्यात आली. मात्र डोंगर माथ्यावर उत्थखननाला कोणतीही मान्यता दिली जाणार नाही. त्यामुळे टेकड्या उद्ध्वस्त होईल असे सांगून ही मागणी फेटाळण्यात आली.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सेवा पंधरवड्याचे उद्घाटन

## येत्या 1 मे पर्यंत सेवा हमी कायद्यांतर्गत अकराशे सेवा डिजीटल करणार; देवेंद्र फडणवीस

**पुणे | प्रतिनिधी**

महसूल विभागाच्या विविध सेवा देतांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या उपयोगाद्वारे सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन आणले जाईल आणि त्याची सुरूवात सेवा पंधरवड्याच्या निमित्ताने करण्यात येईल. सामान्य माणसाचे जीवन अधिक सुलभ करताना त्याच्या समस्या वेगाने दूर करण्यासाठी सेवा हमी कायद्यांतर्गत अकराशे सेवा येत्या १ मेपर्यंत डिजीटल पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

श्री गणेश कला क्रीडा रंगमंच येथे आयोजित 'सेवा पंधरवड्या'च्या राज्यस्तरीय शुभारंभ कार्यक्रमात ते बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराजस्व अभियानांतर्गत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती दरम्यान राज्यभरात 'सेवा पंधरवड्या'चे आयोजन करण्यात आले आहे.

याप्रसंगी उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, खासदार मेधा कुलकर्णी, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार, जमाबंदी आयुक्त डॉ. सुहास दिवसे, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक रवींद्र बिनवडे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, सामान्य माणसाचे जीवन सुखी आणि समृद्ध करण्यासाठी शासनाच्या सेवा सुलभ असणे गरजेचे आहे. सेवा पंधरवडा आणि छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान हा त्याचाच




भाग असून त्यामुळे अनेकांच्या जीवनात परिवर्तन आणण्याचे कार्य होणार आहे. शेतकऱ्यांसाठी पाणंद रस्त्यांचे महत्त्व ओळखून आणि त्यासंदर्भातील वाद टाळण्यासाठी या रस्त्यांचे जीआयएस मॅपींग करण्यात येणार आहे आणि येत्या काळात हा रस्ता तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आपसातील वाद संपुष्टात येतील. या पाणंद रस्त्यांमुळे या गावांचे अर्थकारण बदलेल, नाम फाऊंडेशनच्या सहकार्याने हा उपक्रम एक लोकचळवळ होईल, असा विश्वास श्री.फडणवीस यांनी व्यक्त केला.

लोकअदालतीद्वारे प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत

ई-नोंदणीच्या माध्यमातून सामान्य माणसाला होणारा त्रास कमी होणार आहे, ही अतिशय चांगली व्यवस्था आहे. कार्यालयात नोंदणी करण्यासाठीही चांगल्या सुविधा देण्यात येणार आहे. लोकअदालतीच्या उपक्रमाद्वारे अनेक वर्ष प्रलंबित असलेली प्रकरणे निकालात काढण्यास मदत होणार आहे. महसूल विभागात डिजीटायझेशन होत आहे, ब्लॉक चेन तंत्रज्ञान येत आहे. मात्र नवे तंत्रज्ञान उपयोगात आणताना मानवी चुकांमुळे नवीन प्रकरणे तयार होणार नाहीत याची दक्षता सर्वांनी घ्यावी आणि जुनी प्रकरणे लोकअदालतीच्या माध्यमातून निकाली काढावीत, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.